## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दिनांक १५ सप्टेंबर २०१८
## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ५२४/२०१८ भादविसक ४८९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | ०८/०९/२०१८ रोजी जनता बँक मुख्य कार्यालय शिंदे चौक सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०९/२०१८ रोजी १६.१८ वा |
| **फिर्यादी** | : | विनायक कृष्णाराव फडके वय-५७ रा.११ बी प्लॅाट नं.२०,महावीर कॉलनी विजापूर नाका पोलीस ठाणे सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१.अज्ञात इसम |
| **गेला माल** | : | ५००/-रू दराच्या ४ नोटा व १,०००/-रू दराच्या ७ नोटा |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात येणेप्रमाणे नमुद वर्णनाच्या व किंमतीच्या ५००/-रू व १,०००/-रू दराच्या बनावट नोटा या कोणीतरी अज्ञात इसमाने ह्या ख-या असे भासवुन बँकेची फसवणुक केली म्हणुन **तपास :-सपोनि/जमादार** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ४७३/२०१८ भादविसक ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १४/०९/२०१८ रोजी ११.०० वा १०/०९/२०१८ रोजी १५.०० वा चाटी गल्ली बँक ऑफ बडोदा बँकेत सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०९/२०१८ रोजी २३.१३ वा |
| **फिर्यादी** | : | विजय नारायण दोरनाल वय-४२ रा. १०२/डी/१०५ घोंगडे वस्ती भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१.विजयकुमार बैंगलोर |
| **गेला माल** | : | १,०२,८००/-रू रोख रक्कम |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील आरोपी याने फिर्यादीस तुम्हाला लोन मंजुर करून देतो असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून वेळोवेळी फिर्यादीकडुन लोन मंजुरीच्या प्रोसेससाठी वेळोवेळी पैशांची |

| | | |
|---|---|---|
| | | मागणी करून फिर्यादीचे एकुण १,०२,८००/-रू लोन मंजुर न करता फिर्यादीने भरलेले पैसे देण्यास टाळाटाळ करून त्यांचेकडील मोबाईल नंबर बंद केला आहे.यातील आरोपी याने फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन **तपास :- सपोनि/भुसनूर** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३९६/२०१८ भादविसक ३०७,३४१,५०४,५०६,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १४/०९/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वा सुमारास मन्सुर लॉन्ड्री , मुस्लिम पाच्छा पेठ जवळ सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १५/०९/२०१८ रोजी ०२.४२ वा |
| **फिर्यादी** | : | फिरोज मुस्ताक मणियार वय-३१ व्यवसाय-गॅरेज रा. ३२१, मुस्लिम पाच्छा पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | ०१. अरबाज ईनामदार रा. मुस्लिम पाच्छा पेठ सोलापूर ०२. सद्दाम ईनामदार रा.कुंभारी अ.कोट रोड ता.द.सोलापूर जिल्हा-सोलापूर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात काल दि.१४/०९/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वा सुमारास माझा मित्र शोएब शेख रा.३२१ मुस्लिम पाच्छा पेठ सोलापूर याचे मावस बहिणीची छेड का काढण्याच्या कारणावरून मागील भांडणाचा राग मनात धरून मी माझी मोटारसायकल हिरो पॅशन क्रं.एमएच-१३-सीएन-१२७४ या वरून एकटा जात असताना मन्सुर लॉन्ड्री , मुस्लिम पाच्छा पेठ जवळ सोलापूर येथे माझ्या ओळखीचा अरबाज ईनामदार रा. मुस्लिम पाच्छा पेठ सोलापूर हा त्याचे बरोबर असलेला सद्दाम ईनामदार रा.कुंभारी अ.कोट रोड ता.द.सोलापूर जिल्हा-सोलापूर हे दोघेजण त्याच्या लाल रंगाची बुलेट त्यावर पाठीमागील नंबर प्लेटवर दाऊद असे अक्षरा मध्ये लिहलेले असुन सदर या मोटार सायकलवरून रस्त्याने जात असताना सद्दाम ईनामदार हा माझ्याकडे रागाने पाहून त्याची मोटार सायकल आडवी लावून मला शिवीगाळ करून अरबाज ईनामदार याने त्याच्या कमरेला लावलेली धारदार लोखंडी चाकु काढुन माझ्या डोक्यात चाकुने वार करून मला गंभीर जखमी केले.तसेच सद्दाम ईनामदार हा मला लाथाबुक्यांनी मारहाण करीत होता.त्यानंतर मला दोघेजण मिळुन मारहाण करीत आहे हे पाहुन माझ्या मामचा मुलगा नबिलाल जावेद मुच्छाले हा तेथे भांडण सोडविण्याकरीता आला असता त्याला देखील दोघांणी मिळुन मारहाण करण्यास सुरूवात केली भांडण मध्ये नबिलाल मुच्छाले याला सुध्दा अरबाज ईनामदार यांने शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचा पाठी मध्ये चाकु खुपसून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आणि चाकूने त्यास गंभीर जखमी केले आणि चाकूने त्यास गंभीर दुखापत केले.तसेच सदर ठिकाणी भांडणे चालू असताना माझ्या ओळखीचे तन्वर जहाँगिर मनियार तसेच त्याचा मित्र शरिफ शेख या दोघांनी आम्हास नबिलाल जावेद मुच्छाले आम्हा |

| | | |
|---|---|---|
| | | दोघांना गंभीर दुखापत झाल्यामुळे जावेद महिबूब मुच्छाले यांनी सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथे औषधोपचार होण्याकरीता दाखल केले होते.सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथुन प्राथमिक उपचार घेऊन पुढील उपचाराकरीता नबिलाल जावेद मुच्छाले व मला मार्केडय सहकारी रूणालय सोलापूर येथे अँडमिट करण्यात आलेले आहे.म्हणुन **तपास :-पोसई/लिगाडे** |